# महाराष्ट्र राज्य एनआरएचएमच्या स्वतंत्र संकेतस्थळाचे आरोग्यमंत्र्यांच्या हस्ते उद्‌घाटन

मुंबई, दि. २०: महाराष्ट्र राज्य राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या (एनआरएचएम) www.nrhmmaharashtra.org ह्या स्वतंत्र संकेतस्थळाचे **उद्‌घाटन** आरोग्यमंत्री सुरेश शेट्टी यांच्या हस्ते आज करण्यात आले. मंत्रालयातील आरोग्यमंत्र्यांच्या दालनात झालेल्या या छोटेखानी कार्यक्रमास आरोग्य विभागाचे अपरमुख्य सचिव जे. के. बाँठीया, सचिव भूषण गगराणी, कुटुंब कल्याण आयुक्त तथा एनआरएचएमचे अभियान संचालक विकास खारगे आदी उपस्थित होते.

आरोग्य विभागाच्या ई-गर्व्हनन्सचा भाग म्हणून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान महाराष्ट्र राज्याचे स्वतंत्र संकेतस्थळ असावे यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला असून अभियानांतर्गत असलेल्या विविध योजना, उपक्रम सामान्यांपर्यंत पोहोचण्यासाठी हे संकेतस्थळ उपयुक्त ठरेल, असे आरोग्यमंत्री श्री. शेट्टी यांनी यावेळी सांगितले.

www.nrhmmaharashtra.org हे संकेतस्थळ मराठी आणि इंग्रजी या भाषेत तयार करण्यात आले आहे. राज्यामध्ये एनआरएचएमची व्याप्ती वाढत चालली आहे. नवनविन उपक्रम, लोकोपयोगी योजना यांची अंमलबजावणी जोमाने सुरू आहे याबाबतची लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ असण्याची आवश्यकता होती त्यामुळे हे संकेतस्थळ सुरू करण्यात आल्याची माहिती एनआरएचएमचे अभियान संचालक विकास खारगे यांनी प्रास्ताविकात दिली. या संकेतस्थळावर आरोग्य संदेश, निविदा सूचना, स्त्री भ्रूण हत्या विरोधी कायदा त्याचबरोबर महाराष्ट्रात राबविण्यात येत असलेल्या नाविन्यपुर्ण आणि वैशिष्ट्यपूर्ण योजनांची माहिती होमपेजवर देण्यात आली आहे. राज्यातील जिल्हा निहाय आरोग्य केंद्रांची आणि त्या मार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहितीही आहे. त्याचबरोबर बातम्या आणि ताज्या घडामोडी देखील या संकेतस्थळावर अपडेट करण्यात येणार असल्याचे श्री. खारगे यांनी यावेळी सांगितले.

**अजय जाधव..२०.१०.११**